

# रयत शिक्षण संस्थेचे,

# आर्टस् सायन्स अँड कॉमर्स कॉलेज रामानंदनगर (बुर्ली)

## सांस्कृतिक विभाग

**दिनांक:-०५/०९/२०२०**

## ५, सप्टेंबर शिक्षक दिन अहवाल

५ सप्टेंबर २०२० सर्वपल्ली राधाकृष्णन यांचा जन्मदिन आणि शिक्षक दिन आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज रामानंदनगर (बुर्ली) या महाविद्यालयात उत्साहात ऑनलाइन (गुगल मीट) पद्धतीने साजरा करण्यात आला .या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे प्रोफेसर डॉ. बाबासाहेब बंडगर माजी कुलगुरू पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठ सोलापूर हे लाभले.तर कार्यक्रमाचे अध्यक्ष स्थान महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डॉ.एल.डी. कदम यांनी भूषविले.

या कार्यक्रमाची सुरुवात डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन यांच्या प्रतिमा पूजनाने व कर्मवीर भाऊराव पाटील (अण्णा) यांच्या पुतळयास पुष्पहार अर्पण करून करण्यात आली. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा दिलीप कोने यांनी केले. तर पाहुण्यांचा परिचय प्रा.डॉ. के.बी. भोसले कार्यक्रम अधिकारी राष्ट्रीय सेवा योजना विभाग यांनी केला. या कार्यक्रमांमध्ये डॉ. बाबासाहेब बंडगर यांनी शिक्षकांची महती वेगवेगळया उदाहरणांमधून सांगितले तसेच विद्यार्थ्यांमध्ये नम्रता अंगी करण्यासाठी निसर्गाचे वेगवेगळे दाखले देण्यात आले. उदाहरणार्थ फळ झाड लागलेले झाड झुकले जाते. व फळ नसलेले झाड ताट राहते. म्हणून विद्यार्थ्यांनी नम्रता धारण करावी अशी रामानंदनगर महाविद्यालयात प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना डॉक्टर बाबासाहेब बंडगर यांनी सांगितले.

अध्यक्ष मनोगतात महाविद्यालयाचे आदरणीय प्राचार्य डॉ.एल.डी. कदम यांनी शिक्षक दिनाचे औचित्य साधून राष्ट्रमाता सावित्रीबाई फुले व क्रांती ज्योती महात्मा फुले यांचा आदर्श डोळयासमोर ठेवून सर्व शिक्षक बंधू भगिनींनी आपले आचरण ठेवावे असे सांगून उपस्थितांना शुभेच्छा दिल्या शेवटी कार्यक्रमाचे आभार प्रा. प्रतिभा पुदाले चेअरमन सांस्कृतिक विभाग यांनी मांडले कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्राध्यापक नम्रता कांबळे यांनी केले राष्ट्रगीताने कार्यक्रमाचा सांगता समारोह संपन्न झाला.

निष्पत्ती :1.शिक्षकांचा आदर करावा हि शिकवण मिळाली.
2. विद्यार्थी दशेमध्ये नम्रता अंगीकारण्याचे महत्व विद्यार्थ्यांना पटले.

लाभार्थी संख्या :१७४




प्रतिमेचे पूजन करताना आ. प्राचार्य व सहकारी प्राध्यापक




मा. प्राचार्यांचे स्वागत करताना सहकारी प्राध्यापक









कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पुतळ्यास पुष्पहार अर्पण केला .
शिक्षक दिनानिमित्त कार्यालयीन अधीक्षक यांचा सत्कार करताना

डॉ.सर्वपल्ली राधाक्रीष्णन यांच्या जयंतीनिमित्त प्रतिम
शिक्षक दिनानिमित्त प्राचार्य डॉ.एल.डी.कदम यांचा सत्कार करतान




शिक्षक दिनाच्या कार्यक्रमावेळी मनोगत व्यक्त करताना प्रमुख
पाहुणे प्रोफेसर डॉ.बी.पी.बंडगर

शिक्षक दिनाच्या कार्यक्रमावेळी पाहुण्यांचे स्वागत व
प्रास्ताविक करताना प्रा.दिलीप कोने.







शिक्षकदिनानिमित्त आदरणीय प्राचार्य डॉ. एल.डी.कदम साहेब बोलताना

प्रा. प्रतिभा पुदाले
चेअरमन,
सांस्कृतिक विभाग

प्राचार्य,
आर्टस, सायन्स अँड कॉमर्स कॉलेज रामानंदनगर (बुर्ली)